आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत-अमेरिका व्यापार करारात देशातल्या कृषी आणि खतं क्षेत्रांची काळजी घेतल्याचं सरकारचं संसदेत निवेदन

- वाय. खेमचंद सिंग यांनी घेतली मणिपूरच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ, २ उपमुख्यमंत्री आणि २ मंत्र्यांचाही शपथविधी

- सोन्या-चांदीच्या दरात तेजी कायम, सोनं ५ हजार आणि चांदी साडे १८ हजारांनी महाग

**आणि**

- क्रिकेटमध्ये १९ वर्षाखालील युवकांच्या विश्वचषक स्पर्धेत उपांत्य सामन्यात विजय भारताच्या दृष्टीपथात

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार करारात भारतातल्या कृषी आणि खतं क्षेत्रांची काळजी घेतली आहे. या करारामुळे छोट्या आणि मध्यम उद्योग कुशल कामगारांना नव्या संधी निर्माण होतील, असं निवेदन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी संसदेत बोलताना सांगितलं.

- **- होल्ड बाईट गोयल - - -**

या करारावर दोन्ही देशांनी एक वर्ष चर्चा केली, त्यानंतर त्याला अंतिम स्वरूप दिलं गेलं. या करारात भारताला आपल्या महत्त्वाच्या क्षेत्रांचं हित साधण्यात यश आल्याचं गोयल यांनी सांगितलं. या व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाईल, जेणेकरून त्याची अंमलबजावणी करता येईल, असं ते म्हणाले. अमेरिकेने भारताच्या निर्यातीवरचं आयात शुल्क अठरा टक्क्यांपर्यंत कमी केल्यामुळे अमेरिकन बाजारात भारतीय मालाचा प्रवेश सुलभ होईल. उत्पादन साखळी बळकट करण्यासाठी, रोजगाराच्या संधींचा विस्तार करण्यासाठी, आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी हा करार एक उत्प्रेरक म्हणून काम करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल पत्रकार परिषद घेऊन भारत-अमेरिका व्यापार कराराविषयी निवेदन देणं हा संसदीय परंपरेचा भंग असल्याची टीका काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी राज्यसभेत केली. अधिवेशन सुरू असताना धोरणात्मक मुद्द्यांवर सभागृहाच्या बाहेर चर्चा करणं सभागृहाच्या नियमांचा भंग आहे, असं तिवारी म्हणाले.

**<><><><>**

लोकसभेत आजचा दिवसही गदारोळातच पार पडला. भारत - अमेरिका मुक्त व्यापार करार, चीनसोबतचा सीमावाद आदी मुद्द्यांवर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरात तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

दुपारी कामकाज सुरू झाल्यावर भाजपा खासदार निशीकांत दुबे यांनी सभागृहात काही पुस्तकांचा हवाला देत माजी प्रधानमंत्री दिवंगत जवाहरलाल नेहरू यांच्यासह काँग्रेस नेत्यांवर आरोप केले. त्यामुळे सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज ५ वाजेपर्यंत तहकूब केलं. संध्याकाळी कामकाज सुरू झाल्यावर खासदार पी पी चौधरी बोलत असताना गदारोळ कायम असल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><>**

राज्यसभेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावरच्या चर्चेत केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी देशाच्या विकासाचा आढावा आपल्या भाषणात घेतला. भारताने गेल्या दशकभरात जगातली वेगाने वाढणारी अर्थव्यवव्यस्था म्हणून मान मिळवल्याचं नड्डा म्हणाले.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या काळात देशात सामाजिक न्याय आणि सौहार्द लयाला गेल्याचा आरोप राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. अनुसूचित जाती-जमाती, महिला यांच्याविरुद्धच्या गुन्ह्याची संख्या वाढली आहे, मणिपूरच्या लोकांना संरक्षण पुरवण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><>**

कॅनडातल्या २४ विद्यापीठांच्या शिष्टमंडळानं आज केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची नवी दिल्ली इथं भेट घेतली. देशातल्या विविध उच्च शिक्षण संस्थांमधे संयुक्त संशोधन प्रकल्प सुरु करण्यात आणि अभ्यासक्रमांमधे सहभागी होण्यात रस दाखवल्याबद्दल प्रधान यांनी शिष्टमंडळाची प्रशंसा केली. भारतात या विद्यापीठांनी आपापले परिसर सुरु करावे असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

भाजपा नेते वाय. खेमचंद सिंग यांनी आज मणिपूरच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल अजय कुमार भल्ला यांनी संध्याकाळी लोकभवनात झालेल्या कार्यक्रमात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी नेमचा किपगेन आणि एल. डिखो यांनी उपमुख्यमंत्रीपदाची तसंच २ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. गेल्यावर्षी फेब्रुवारी महिन्यात मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. आज दुपारी ही राष्ट्रपती राजवट उठवण्यात आली.

<><><><>

जम्मू काश्मीरमधे उधमपूर जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत दोन पाकिस्तानी दहशतवादी ठार झाले. जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या रुबानी उर्फ अबु माविया याचा त्यात समावेश आहे.

<><><><>

तिरुमला तिरुपती देवस्थानात प्रसादाच्या लाडवांसाठी तूप खरेदी करण्याबाबातचे प्रश्न सोडवण्यासाठी आंध्र प्रदेश सरकारने अल्पकालीन समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. मालाचा दर्जा राखण्यासाठी खरेदी प्रक्रीयेत सुधारणांच्या शिफारशी ही समिती करील.

<><><><>

सोनं आणि चांदीच्या दरात सुरू असलेली तेजी आजही कायम राहिली. दिवसअखेर चांदी किलोमागे साडे १८ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं मुंबईच्या सराफा बाजारात एक किलो चांदीचा दर २ लाख ९१ हजारांच्या जवळपास गेला होता. सोनंही आज तोळ्यामागे ५ हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं १ तोळा २४ कॅरेट सोनं १ लाख ६१ हजार रुपये आणि १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५७ हजार रुपये मोजावे लागत होते.

माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या समभागात जोरदार घसरण झाल्यानं शेअर बाजारातली तेजी आज झाकोळली गेली. त्यामुळं दिवसअखेर सेन्सेक्स ७९ अंकांनी वधारुन ८३ हजार ८१८ अंकांवर बंद झाला. निफ्टी ४८ अंकांची वाढ नोंदवून २५ हजार ७७६ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसांची द्वैमासिक बैठक आजपासून सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा परवा सकाळी १० वाजता बैठकीतले निर्णय जाहीर करतील.

<><><><><>

देशातल्या ८८ टक्के करदात्यांनी नवीन कर पद्धतीचा अवलंब केला आहे. सध्यातरी जुनी कर पद्धती बंद करण्याचा कुठलाही विचार नसल्याचं केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी आज वृत्तसंस्थेशी बोलताना स्पष्ट केलं.

<><><><><>

देशातली हजारो विमान उड्डाणं रद्द केल्याबद्दल इंडिगो या विमान कंपनीविरुद्ध भारतीय स्पर्धा आयोगाने आज सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

उद्योगपती अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांशी संबंधित फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी वेगाने करावी, त्याकरता विशेष तपास पथकाची स्थापना करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज सीबीआय आणि ईडीला दिले. अनिल अंबानी यांच्या अनेक कंपन्यांमध्ये सार्वजनिक निधीचा गैरवापर, आर्थिक विवरणांमध्ये फेरफार केल्याचा आरोप करणाऱ्या जनहित याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

<><><><><>

गाझापट्टीत इस्राएली सैन्याने केलेल्या गोळीबारात किमान 21 पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला. त्यात बहुतांश महिला आणि लहान मुलांचा समावेश आहे. दुसरीकडे सशस्त्र दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात आपला एक सैनिक जखमी झाल्याचं इस्राएलचं म्हणणं आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

४ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**<><><><><>**

चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे चर्चा केल्याचं चीनमधल्या प्रसारमाध्यमांनी सांगितलं. या चर्चेचा तपशील अद्याप कळू शकला नाही.

पाश्चिमात्य देश आणि चीन यांच्यातले संबंध सुधारण्या संदर्भात झालेल्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर जिनपिंग आणि पुतीन यांच्यात ही चर्चा झाली.

**<><><><><>**

अमेरिकेच्या मध्यस्थीने रशिया आणि युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी सुरू असलेल्या वाटाघाटींसाठी आज रशिया आणि युक्रेनच्या प्रतिनिधींमधे अबुधाबीमधे चर्चा झाली. यात दोन्ही देशांची शिष्टमंडळं सहभागी झाली होती असं युक्रेनचे राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण कौन्सिलचे प्रमुख रुस्तम उमरोव यांनी समाजमाध्यमावर सांगितलं.

**<><><><><>**

पुणे–मुंबई द्रुतगती महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपेलिन गॅसची वाहतूक करणारा टँकर उलटल्यामुळे महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. काल संध्याकाळपासून वाहतूक कोंडी कायम असल्यानं आता ३० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

या वाहतूक कोंडीचा मोठा फटका एसटीच्या बस सेवांवर झाला आहे. या परिस्थितीमुळे राज्याच्या विविध विभागांमधल्या एकूण १३९ बस फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. पुणे–मुंबई द्रुतगती महामार्गावरच एसटीच्या एकूण १६३ गाड्या वाहतूक कोंडीत अडकल्या. पुण्यावरून मुंबईला जाणाऱ्या गाड्या रद्द केल्या आहेत. द्रुतगती महामार्गावरची वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्यानं पूर्ववत केली जाईल, असं एसटीनं कळवलं आहे.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये १९ वर्षाखालच्या युवकांच्या विश्वचषक स्पर्धेत आज हरारे इथं सुरु असलेल्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्तानं भारतापुढं ३११ धावांचं आव्हान ठेवलं आहे. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. आणि निर्धारित ५० षटकात ४ गडी गमावून ३१० धावा केल्या. शतकवीर फैजल शिनोजादाच्या ११०, आणि उजैरुल्ला नैजलच्या १०१ धावांचा त्यात मोठा वाटा होता.

भारताकडून आरोन जॉर्जनं शतक पूर्ण केलं आहे. वैभव सुर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांनी अर्धशतक केलं. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४१ व्या षटकांत ३ बाद ३०८ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//